# महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ कार्यालय इमारत
(दुसरा व चौथा मजला) सर्व्हे नं. ८३२ ए, शिवाजीनगर, पुणे - ४११ ००४.
Website : www.mscepune.in Email : mscepune@gmail.com दूरध्वनी क्र. 020-26123066/67

## प्रसिध्दीपत्रक

## शिक्षण आयुक्तालय (राज्यस्तरावरील कार्यालयातील पदे) भरती परीक्षा - २०२३

शिक्षण आयुक्तालय (राज्यस्तरावरील कार्यालयातील पदे) स्तरावर सध्याच्या मंजूर असलेल्या पदांपैकी रिक्त असलेल्या ८० टक्के प्रमाणे **(मुख्य लिपिक - ६, वरिष्ठ लिपिक - १४, निम्नश्रेणी लघुलेखक - ०३ असे एकूण २३ पदे)** ही भूतपूर्व दुय्यम सेवा मंडळाच्या सेवा कक्षेतील (महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या कक्षे बाहेरील) गट-क संवर्गातील असून सदर पदभरती परीक्षा ही महाराष्ट्रातील सर्व जिल्ह्यांतील उपलब्ध केंद्रांवर घेण्यात येणार आहे. त्यानुसार सदर परीक्षेसाठी ऑनलाईन पध्दतीने आवेदनपत्र पात्र उमेदवारांकडून मागविण्यात येत आहेत तसेच परीक्षेचा दिनांक यथावकाश संकेतस्थळावर कळविण्यात येईल.

तरी पात्र उमेदवारांनी ऑनलाईन प्रणालीव्दारे https://ibpsonline.ibps.in/mscepdec23 / www.mscepune.in या संकेतस्थळावर दि. २३/०३/२०२४ ते दि.०८/०४/२०२४ रोजी २३.५९ वाजेपर्यंत ऑनलाईन आवेदनपत्र व शुल्क भरण्याची कार्यवाही करावी.

तथापि आवेदनपत्र भरतेवेळी काही अडचणी उद्‌भल्यास bpvmscepune२०२३@gmail.com या ईमेल वर संपर्क करावा.

**ठिकाण : पुणे**
**दिनांक : १३/०३ /२०२४.**

(अनुराधा ओक)
आयुक्त,
महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद,
पुणे - ०४.

**महाराष्ट्र शासन**
**शिक्षण आयुक्तालय**
**महाराष्ट्र राज्य, मध्यवर्ती इमारत**
**पुणे - ४११ ००१**

**शिक्षण आयुक्तालय (राज्यस्तरावरील कार्यालयातील पदे) भरती परीक्षा - २०२३ या परीक्षेची ऑनलाईन पध्दतीने आयोजन करण्यात येणार असून त्यासाठी ऑनलाईन प्रणालीव्दारे अर्ज मागविण्यात येत आहेत.**

भूतपूर्व दुय्यम सेवा निवड मंडळाच्या कक्षेतील (महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या कक्षे बाहेरील) गट-क खालील संवर्गातील एकूण २३ पदे भरण्यासाठी परीक्षा महाराष्ट्रातील सर्व जिल्ह्यांतील उपलब्ध केंद्रांवर घेण्यात येईल.

**१. सरळसेवेने भरावयाचा पदाचा आरक्षणनिहाय तपशील :**
**संवर्गाचे नाव - मुख्य लिपिक**

| | आरक्षण → | अ.जा. | अ.ज. | वि.जा. (अ) | भ.ज. (ब) | भ.ज. (क) | भ.ज. (ड) | वि.मा.व. | इ.मा.व. | आ.दु.घ. | अराखीव पदे | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | भरावयाची पदे | १ | १ | ० | ० | ० | ० | ० | १ | १ | २ | ६ |
| सरळसेवेचे समांतर आरक्षण | १) सर्वसाधारण | १ | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | १ | ३ |
| | २) महिला | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | १ | ० | १ | २ |
| | ३) माजी सैनिक | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | १ | ० | १ |
| | ४) पदवीधर अंशकालीन कर्मचारी | एकूण १ पद | | | | | | | | | | |
| | ५) प्राविण्य प्राप्त खेळाडू | - | | | | | | | | | | |
| | ६) प्रकल्पग्रस्त | - | | | | | | | | | | |
| | ७) दिव्यांग | - | | | | | | | | | | |
| | ८) भूकंपग्रस्त | - | | | | | | | | | | |
| | ९) अनाथ | - | | | | | | | | | | |

**२. सरळसेवेने भरावयाचा पदाचा आरक्षणनिहाय तपशील :**

**संवर्गाचे नाव - वरिष्ठ लिपिक**

| आरक्षण → | | अ.जा. | अ.ज. | वि.जा. (अ) | भ.ज. (ब) | भ.ज. (क) | भ.ज. (ड) | वि.मा.व. | इ.मा.व. | आ.दु.घ. | अराखीव पदे | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| भरावयाची पदे | | १ | १ | १ | ० | १ | ० | ० | ३ | २ | ५ | १४ |
| सरळसेवेचे समांतर आरक्षण | १) सर्वसाधारण | १ | १ | ० | ० | ० | ० | ० | २ | १ | २ | ७ |
| | २) महिला | ० | ० | १ | ० | ० | ० | ० | १ | १ | १ | ४ |
| | ३) माजी सैनिक | ० | ० | ० | ० | १ | ० | ० | ० | ० | १ | २ |
| | ४) पदवीधर अंशकालीन कर्मचारी | एकूण १ पद | | | | | | | | | | |
| | ५) प्राविण्य प्राप्त खेळाडू | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | १ | १ |
| | ६) प्रकल्पग्रस्त | एकूण १ पद | | | | | | | | | | |
| | ७) दिव्यांग | एकूण १ पद अंध/अल्पदृष्टी (Blind/Low Vision) | | | | | | | | | | |
| | ८) भूकंपग्रस्त | - | | | | | | | | | | |
| | ९) अनाथ | - | | | | | | | | | | |

**३. सरळसेवेने भरावयाचा पदाचा आरक्षणनिहाय तपशील :**

**संवर्गाचे नाव - निम्नश्रेणी लघुलेखक**

| | आरक्षण → | अ.जा. | अ.ज. | वि.जा (अ) | भ.ज. (ब) | भ.ज. (क) | भ.ज. (ड) | वि.मा.व. | इ.मा.व. | आ.दु.घ. | अराखीव पदे | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | भरावयाची पदे | ० | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | १ | १ | ३ |
| सरळसेवेचे समांतर आरक्षण | १) सर्वसाधारण | ० | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | १ | २ |
| | २) महिला | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | १ | ० | १ |
| | ३) माजी सैनिक | - | | | | | | | | | | |
| | ४) पदवीधर अंशकालीन कर्मचारी | - | | | | | | | | | | |
| | ५) प्राविण्य प्राप्त खेळाडू | - | | | | | | | | | | |
| | ६) प्रकल्पग्रस्त | - | | | | | | | | | | |
| | ७) दिव्यांग | - | | | | | | | | | | |
| | ८) भूकंपग्रस्त | - | | | | | | | | | | |
| | ९) अनाथ | - | | | | | | | | | | |

**१. पात्रतेचे निकष -**

उमेदवार भारताचा नागरिक असला पाहिजे व महाराष्ट्रातील रहिवासी असणे आवश्यक आहे.

**२. दिव्यांग व्यक्ती पात्रता -**

दिव्यांग व्यक्ती हक्क अधिनियम २०१६ च्या शालेय शिक्षण विभाग शासन निर्णय क्र. संकीर्ण - २०२१/प्र.क्र. १७/२१/प्रशा-५ दि. ०१/०६/२०२१ तसेच यासंदर्भात शासनाकडून वेळोवेळी जारी करण्यात आलेल्या आदेशानुसार दिव्यांग व्यक्तींच्या आरक्षणासंदर्भात कार्यवाही करण्यात येईल.

**३. वयोमर्यादा -**

| अ.क्र. | संवर्ग | वयोमर्यादा गणण्याचा दिनांक | वय | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | किमान अमागास/ मागासवर्गीय/ आ.दु.घ. | कमाल | | प्रविण्य प्राप्त खेळाडू | | माजी सैनिक, आणिबाणि व अल्पसेवा राजादिष्ट अधिकारी | | अंशकालिन पदवीधर / पदविकाधारक उमेदवार | दिव्यांग / प्रकल्पग्रस्त / भुकंपग्रस्त उमेदवार |
| | | | | अमागास | मागासवर्गीय/अनाथ/ आ.दु.घ. | अमागास | मागासवर्गीय /अनाथ /आ.दु.घ. | अमागास | मागासवर्गीय /अनाथ / आ.दु.घ. | | |
| १ | मुख्य लिपिक | ०१-०३-२०२४ | १८ | ३८ | ४३ | ४३ | ४३ | ३८ + सेवा कालावधी + ३ वर्ष | ४३ + सेवाकालावधी + ३ वर्ष | वयाच्या ५५ वर्षापर्यंत | वयाच्या ४५ वर्षापर्यंत |
| २ | वरिष्ठ लिपिक | ०१-०३-२०२४ | १८ | ३८ | ४३ | ४३ | ४३ | ३८ + सेवा कालावधी + ३ वर्ष | ४३ + सेवाकालावधी + ३ वर्ष | वयाच्या ५५ वर्षापर्यंत | वयाच्या ४५ वर्षापर्यंत |
| ३ | निम्नश्रेणी लघुलेखक | ०१-०३-२०२४ | १८ | ३८ | ४३ | ४३ | ४३ | ३८ + सेवा कालावधी + ३ वर्ष | ४३ + सेवाकालावधी + ३ वर्ष | वयाच्या ५५ वर्षापर्यंत | वयाच्या ४५ वर्षापर्यंत |

वयोमर्यादेबाबत शासन वेळोवेळी शासन निर्णयाव्दारे विहित करील, अशी वयोमर्यादा लागू राहील.

**४. शैक्षणिक व व्यावसासिक पात्रता -**

| अ. क्र. | पदाचे नाव | शैक्षणिक व व्यावसासिक अर्हता |
|---|---|---|
| १ | मुख्य लिपिक / वरिष्ठ लिपिक | • मान्यताप्राप्त विद्यापीठाची कोणत्याही शाखेची पदवी परीक्षा उत्तीर्ण.<br>• टंकलेखन / संगणक टंकलेखन मराठी ३० श.प्र.मि. व इंग्रजी ४० श.प्र.मि. शासकीय वाणिज्य प्रमाणपत्र परीक्षा उत्तीर्ण असणे आवश्यक.<br>• मुख्य लिपिक पदासाठी किमान दोन वर्षाचा शासकीय/ निमशासकीय कार्यालयातील वरिष्ठ लिपिक पदाचा अनुभव आवश्यक.<br>• वरिष्ठ लिपिक पदासाठी किमान दोन वर्षाचा शासकीय/ निमशासकीय कार्यालयातील कनिष्ठ लिपिक / लिपिक नि टंकलेखन पदाचा अनुभव.<br>• एम.एस.सी.आय.टी. परीक्षा उत्तीर्ण आवश्यक आहे. |
| २ | लघुलेखक निम्नश्रेणी | • मान्यताप्राप्त विद्यापीठाची कोणत्याही शाखेची पदवी परीक्षा उत्तीर्ण.<br>• टंकलेखन / संगणक टंकलेखन मराठी ३० श.प्र.मि., इंग्रजी ४० श.प्र.मि. व इंग्रजी व मराठी लघुलेखन १०० श.प्र.मि. चे शासकीय वाणिज्य प्रमाणपत्र परीक्षा उत्तीर्ण असणे आवश्यक.<br>• एम.एस.सी.आय.टी. परीक्षा उत्तीर्ण आवश्यक आहे. |

प्रस्तुत जाहिरातीस अनुसरुन अर्ज सादर करण्यासाठी विहित केलेल्या अंतिम दिनांकास संबंधित शैक्षणिक व व्यावसायिक अनुषगिंक अर्हता धारण करणे आवश्यक आहे.

**५. अभ्यासक्रम -**

महाराष्ट्र लोकसेवा आयोगाने गट-क साठी निश्चित केलेला अभ्यासक्रम व सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय दि. ०४ मे, २०२२ नुसार सदर परीक्षेचा अभ्यासक्रम निश्चित करण्यात आलेला आहे.

| मराठी | | इंग्रजी | | सामान्य ज्ञान | | बौध्दिक चाचणी | | एकूण गुण | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| प्रश्न | गुण | प्रश्न | गुण | प्रश्न | गुण | प्रश्न | गुण | प्रश्न | गुण |
| ५० | ५० | ५० | ५० | ५० | ५० | ५० | ५० | २०० | २०० |

**(परीक्षेचा कालावधी - १२० मिनिटे)**

ज्या पदांकरिता पदवी ही कमीतकमी अर्हता आहे, अशा पदांकरिता परीक्षेचा दर्जा भारतातील मान्यताप्राप्त विद्यापीठांच्या पदवी परीक्षेच्या दर्जाच्या समान राहील. परंतू त्यापैकी मराठी व इंग्रजी या विषयांच्या प्रश्नपत्रिकेचा दर्जा उच्च माध्यमिक शालांत परीक्षेच्या (इयत्ता १२ वी दर्जाच्या) समान राहील.

**६. परीक्षेचे स्वरुप -**

परीक्षा ही ऑनलाईन (Computer Based Test) पध्दतीने घेण्यात येईल. परीक्षेच्या प्रश्नपत्रिका वस्तुनिष्ठ बहुपर्यायी स्वरुपाच्या असतील. प्रश्नपत्रिकेत प्रत्येक प्रश्नास ०१ गुण असेल.

**७. सर्वसाधारण सूचना -**

७.१ अर्ज फक्त ऑनलाईन प्रणालीव्दारे स्वीकारण्यात येतील.

७.२ उमेदवाराने पात्रतेनुसार प्राधान्यक्रम निवडावे.

७.३ वेळोवेळी शासन निर्णय व आरक्षण धोरणात बदल झाल्यास ते यथा नियम लागू राहिल.

**८. पदसंख्या व आरक्षणासंदर्भात सर्वसाधारण तरतुदी -**

८.१ पदसंख्या व आरक्षणामध्ये शासनाच्या संबंधित विभागांच्या सूचनेनुसार बदल / वाढ होण्याची शक्यता आहे.

८.२ विविध मागास प्रवर्ग, महिला, माजी सैनिक, अंशकालीन, प्रकल्पग्रस्त, भुकंपग्रस्त, प्रावीण्यप्राप्त खेळाडू, अनाथ इत्यादीसाठी सामाजिक व समांतर आरक्षण शासनाकडून वेळोवेळी निर्गमित करण्यात येणाऱ्या आदेशानुसार राहील.

८.३ महिलांसाठी आरक्षित पदाकरीता दावा करणाऱ्या उमेदवारांनी महिला आरक्षणाचा लाभ घ्यावयाचा असल्यास अर्जामध्ये न चुकता महाराष्ट्राचे अधिवासी (Domicile) असल्याबाबतचा तसेच नॉनक्रीमीलेअर (Non creamy layer) मध्ये मोडत असल्याबाबत (अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती वगळून) स्पष्टपणे दावा करणे आवश्यक आहे.

८.४ ऑनलाईन अर्ज करतांना एखादी जात / जमात राज्य शासनाकडून आरक्षणासाठी पात्र असल्याचे घोषित केली असल्यासच तसेच सक्षम प्राधिकाऱ्याने प्रदान केलेले प्रमाणपत्र उमेदवारांकडे उपलब्ध असेल तर संबंधित जात / जमातीचे उमेदवार आरक्षणाच्या दाव्यासाठी पात्र असतील.

८.५ आर्थिक दृष्ट्या दुर्बल घटकातील (ईडब्लूएस) उमेदवारांकरीता शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्र. राआधो-४०१९/प्र.क्र.३१/१६-अ, दि. १२ फेब्रुवारी, २०१९ व दि. ३१ मे, २०२१ अन्वये विहित करण्यात आलेले प्रमाणपत्र, कागदपत्र पडताळणीच्या वेळी सादर करणे आवश्यक राहील.

८.६ अद्ययावत नॉन क्रिमीलेयर प्रमाणपत्र / आर्थिकदृष्टया दुर्बल घटकातील असल्याबाबतचा पुरावा म्हणून सक्षम प्रधिकाऱ्याने वितरीत केलेले व ऑनलाईन अर्ज सादर करण्याच्या अंतिम दिनांकास वैध असणारे प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे.

८.७ आरक्षणाचा (सामाजिक अथवा समांतर) अथवा सोयी सवलतींचा दावा करणाऱ्या उमेदवारांकडे संबंधित कायदा / नियम / आदेशानुसार विहित नमुन्यातील प्रस्तुत जाहिरातीस अनुसरून अर्ज स्वीकारण्यासाठी विहित केलेल्या दिनांकापूर्वीचे वैध प्रमाणपत्र उपलब्ध असणे अनिवार्य आहे.

८.८ **खेळाडूसाठीचे आरक्षण** - शासन निर्णय, शालेय शिक्षण व क्रीड विभाग, क्रमांक : राक्रीधा-२००२/प्र.क्र.६७/क्रियुसे-२, दि. १ जुलै, २०१६ तसेच शासन शुध्दीपत्रक, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग क्रमांक : राक्रीधा-२००२/प्र.क्र.६७/क्रीयुसे०२, दि. १८ ऑगस्ट, २०१६, शासन निर्णय शालेय शिक्षण व क्रीडा विभाग क्रमांक : संकिर्ण - १७१६/प्र.क्र.१८/क्रीयुसो-२, दि. ३० जून, २०२२ आणि तदूनंतर शासनाने यासंदर्भात

वेळोवेळी निर्गमित केलेल्या आदेशानुसार प्रविण्यप्राप्त खेळाडू आरक्षणासंदर्भात तसेच वयोमर्यादा सवलती संदर्भात कार्यवाही करण्यात येईल.

प्राविण्यप्राप्त खेळाडू व्यक्तीसाठी आरक्षणाचा दावा करणाऱ्या उमेदवारांच्या बाबतीत क्रीडा विषयक विहित अर्हता धारण करीत असल्याबाबत सक्षम प्राधिकाऱ्याने प्रमाणित केलेले पात्र खेळाचे प्राविण्य प्रमाणपत्र अर्ज सादर करण्याच्या अंतिम दिनांकाचे किंवा तत्पूर्वीचे असणे आवश्यक आहे.

८.९ **माजी सैनिक आरक्षण - १.** उमेदवार माजी सैनिक स्वत: तसेच शहीद सैनिकांचे कुटुंबीय असल्यास त्यांनी त्याबाबत स्पष्टपणे दावा करणे आवश्यक आहे अन्यथा अनुज्ञेय असलेले लाभ मिळणार नाहीत.

२. माजी सैनिकाकरीता आरक्षणा संदर्भातील तरतुदी शासनाकडून वेळोवेळी निर्गमित करण्यात येणाऱ्या आदेशानुसार असतील.

शासन सामान्य प्रशासन विभाग निर्णय क्रमांक आरटीए-१०८२/३५०२/सीआर-१००/१६-अ दि. ०२ सप्टेंबर, १९८३ नुसार.

८.१० **दिव्यांग आरक्षण** - दिव्यांग व्यक्ती हक्क अधिनियम २०१६ च्या आधारे शासन निर्णय सामान्य प्रशासन विभाग, क्र. दिव्यांग २०१८/प्र.क्र.११४/१६ अ, दि. २९ मे, २०१९ तसेच या संदर्भात शासनाकडून वेळोवेळी निर्गमित करण्यात आलेल्या आदेशानुसार दिव्यांग व्यक्तींच्या आरक्षणासंदर्भात कार्यवाही करण्यात येईल. दिव्यांग व्यक्तींसाठी असलेल्या वयोमर्यादेचा अथवा इतर कोणत्याही प्रकारचा लाभ घेऊ इच्छिणाऱ्या उमेदवारांनी शासन निर्णय, सार्वजणिक आरोग्य विभाग, क्र. अप्रकि-२०१८/प्र.क्र.४६/आरोग्य-६, दि. १४ सप्टेंबर, २०१८ मधील आदेशानुसार केंद्रशासनाच्या www.swavlambancard.gov.in अथवा SADM या संगणकीय प्रणालीव्दारे वितरीत करण्यात आलेले नवीन नमुन्यातील दिव्यांगत्वाचे प्रमाणपत्र सादर करणे अनिवार्य आहे.

८.११ **पदवीधर / पदविकाधारक अंशकालिन कर्मचारी आरक्षण** - शासन निर्णय सामान्य प्रशासन विभाग क्र. पअंक-१००९/प्र.क्र.२००/२००९/१६-अ, दि. २७/१०/२००९ तसेच या संदर्भात शासनाकडून वेळोवेळी नमूद करण्यात येणाऱ्या आदेशानुसार पदवीधर अंशकालिन कर्मचारी आरक्षण राहील व शासन परीपत्रक सामान्य प्रशासन विभाग क्र. संकिर्ण/१११९/प्र.क्र.८९/१६-अ, दिनांक २८/०५/२०१९ अन्वये कमाल वयोमर्यादा निश्चित करण्यात आली आहे.

८.१२ **प्रकल्पग्रस्त आरक्षण** - शासन निर्णय सामान्य प्रशासन विभाग, क्र. एईएम-१०८०/३५/१६-अ, दि. २०/०१/१९८० तसेच यासंदर्भात शासनाकडून वेळोवेळी नमुद करण्यात येणाऱ्या आदेशानुसार प्रकल्पग्रस्तासाठीचे आरक्षण राहील व शासन निर्णय क्र. विकाक २२१५/प्र.क्र. ३३७/१६-अ, दि. ०४/११/२०१६ अन्वये कमाल वयोमर्यादा निश्चित करण्यात आली आहे.

८.१३ **भूकंपग्रस्त आरक्षण** - शासन निर्णय सामान्य प्रशासन विभाग, क्र. भूकंप-१००९/प्र.क्र.२०७/२००९/१६-अ, दि. २७/०८/२००९ तसेच या संदर्भात शासनाकडून वेळोवेळी नमूद करण्यात येणाऱ्या आदेशानुसार भूकंपग्रस्ताचे आरक्षण राहील शासन निर्णय क्र. विकाक २२१५/प्र.क्र. ३३७/१६-अ, दि. ०४/११/२०१६ अन्वये कमाल वयोमर्यादा निश्चित करण्यात आली आहे.

८.१४ सामाजिक व समांतर आरक्षणासंदर्भात विविध न्यायालयामध्ये दाखल न्यायप्रविष्ट प्रकरणी अंतिम निर्णयाच्या अधीन राहून पदभरतीची कार्यवाही करण्यात येईल.

९. **निवड प्रक्रीया -**

९.१ अर्ज केलेला उमेदवार हा महाराष्ट्र राज्याचा राहिवासी असावा व त्याच्याकडे महाराष्ट्र राज्याचे अधिवास प्रमाणपत्र असणे आवश्यक आहे.

९.२ अर्ज केलेल्या उमेदवारांसाठी शासन महसूल व वन विभाग निर्णय क्र. रिपभ/प्र.क्र.६६/२०११/ई-१० दिनांक २७ जुन २०११ नुसार ज्या उमेदवाराकडे अधिवास प्रमाणपत्र (Domicile Certificate) उपलब्ध नसल्यास त्यांनी त्यांचा जन्म महाराष्ट्र राज्यात झाला असल्याचा जन्म दाखला (Birth Certificate) सादर करणे आवश्यक आहे. अशा प्रकरणात अधिवास प्रमाणपत्राची अट लागू राहणार नाही. सदर उमेदवाराकडे अधिवास प्रमाणपत्र तसेच जन्म तारखेचा दाखला उपलब्ध नसल्यास, त्या उमेदवाराने आपला शाळा सोडल्याचा दाखला

सादर करणे आवश्यक राहील. परंतू सदर शाळा सोडल्याच्या दाखल्यामध्ये त्या उमेदवाराचा जन्म हा महाराष्ट्र राज्यात झाल्याची नोंद असणे आवश्यक आहे. अशा प्रकरणात अधिवास
प्रमाणपत्राची अट लागू राहणार नाही. ज्या उमेदवाराचा जन्म महाराष्ट्र राज्यात झाला नसेल परंतू महाराष्ट्र राज्यातील रहिवास सलग १५ वर्षे व त्यापेक्षा अधिक कालावधीचा आहे अशा उमेदवारांसाठी अधिवास प्रमाणपत्र (Domicile Certificate) आवश्यक राहील.

९.३ उमेदवाराने अर्ज केला अथवा विहित अर्हता धारण केली म्हणजे परीक्षेला बोलविण्याचा अथवा नियुक्तीचा हक्क प्राप्त झाला असे नाही.

९.४ आरक्षित मागास प्रवर्गाचा दावा करणाऱ्या उमेदवारांना ज्या संदर्भातील सक्षम अधिकाऱ्याने दिलेले जात प्रमाणपत्र (Cast Certificate) व उपलब्ध असल्यास जात वैधता प्रमाणपत्र (Validity Certificate) निवडीअंती सादर करणे आवश्यक आहे.

९.५ जात वैधता प्रमाणपत्र उपलब्ध नसल्यास, शासन सामान्य प्रशासन विभाग निर्णय क्रमांक बीसीसी-२०११/प्र.क्र.१०६४/२०११/१६-ब दिनांक १२ डिसेंबर २०११ मधील तरतूदीनुसार, याचिका क्र. २१३६/२०११ व अन्य याचिकांवर मा. मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठाने दि. २५/०८/२०११ रोजी दिलेल्या आदेशाच्या विरोधात मा. सर्वोच्च न्यायालय, नवी दिल्ली येथे दाखल केलेल्या एसएलपी मधील आदेशाच्या अधीन राहून तात्पूरते नियुक्ती आदेश निर्गमित केल्याच्या दिनांकापासून ०६ महिन्याच्या आत जात वैधता प्रामाणपत्र सादर करणे अनिवार्य आहे, अन्यथा त्यांची नियुक्ती पुर्वलक्षीत प्रभावाने रद्द करण्यात येईल.

९.६ उमेदवारांना परीक्षेसाठी स्वखर्चाने उपस्थित रहावे लागेल. परीक्षेसाठी नेमून दिलेल्या परीक्षा केंद्रावर दिलेल्या वेळेपूर्वी ०१ तास ३० मिनिटे (९० मिनिटे) अगोदर उपस्थित रहावे.

९.७ नियुक्ती होणाऱ्या उमेदवारास शासन वित्त विभाग निर्णय क्रमांक अंनियो १००५/१२६/सेवा-४ दिनांक ३१ ऑक्टोंबर २००५ नुसार लागू करण्यात आलेली नवीन परिभाषित अंशदायी निवृत्तीवेतन योजना (New Defined Contributory Pension Scheme) लागू राहील. त्यांना महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तीवेतनाचे अंशराशीकरण) नियम १९८४ आणि सर्वसाधारण भविष्य निर्वाहनिधी योजना लागू राहणार नाही. तथापि, सदर नियमात भविष्यात काही बदल झाल्यास त्याप्रमाणे योजना लागू राहील.

९.८ अंतिम निवड यादीतील पात्र उमेदवारांनी सादर केलेल्या विविध प्रमाणपत्राच्या साक्षांकित प्रती मूळ प्रमाणपत्राचे अधारे कागदपत्रे तपासणीवेळी तपासण्यात येतील. सदर प्रमाणपत्राच्या साक्षांकित प्रती मूळ प्रमाणपत्राच्या आधारे कागदपत्र तपासण्याच्या वेळी उपलब्ध करुन देणे उमेदवारांना बंधनकारक राहील. त्यामधील प्रमाणपत्रे खोटी किंवा चुकीची आढळल्यास संबंधीत उमेदवारास अपात्र ठरवण्यात येईल.

**१०. ऑनलाईन अर्ज करण्याची पध्दत:**

१०.१ महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेमार्फत पुरविण्यात आलेल्या https://ibpsonline.ibps.in/mscepdec२३/ या लिंकव्दारे विहित पध्दतीने नोंदणी करून आपला ऑनलाईन अर्ज सादर करणे आवश्यक आहे.

१०.२ परीक्षा शुल्काचा भरणा विहित पध्दतीने करणे आवश्यक आहे.

१०.३ ऑनलाईन अर्ज सादर करतांना खालील कागदपत्रे अपलोड करावी लागतील.

**(अ) पासपोर्ट साईज फोटो** - उमेदवाराने त्याचा स्कॅन केलेला नवीनतम पासपोर्ट साईज (४.५ सेमी X ३.५ सेमी) फोटो अपलोड करणे आवश्यक आहे.

**आकारमान** - 200 X 300 pixels

**फाईल साईज** - 20 kb - 50 kb

**(ब) स्वाक्षरी** - उमेदवाराने त्याची पांढ्या कागदावर काळया शाईने स्वाक्षरी करून स्कॅन केलेली स्वाक्षरी अपलोड करणे आवश्यक आहे.

**आकारमान - १४० X ६० pixels**

**फाईल साईज - १०kb - २० kb**

**(क) डाव्या हाताच्या अंगठ्याची निशाणी -** उमेदवाराने त्याच्या डाव्या हाताच्या अंगठयाची निशाणी (३ सेमी X ३ सेमीपांढऱ्या कागदावर काळया / निळयाशाई मध्ये) स्कॅन केलेली प्रतिमा अपलोड करणे आवश्यक आहे. ज्या उमेदवाराला डाव्या हाताचा अंगठा नसेल अशा उमेदवारांनी उजव्या हाताच्या अंगठयाची निशाणी वापरावी.

**आकारमान** - 240 X 240 pixels in 200 DPI

**फाईल साईज** - 20 kb - 50 kb

**(ड) स्व-हस्ताक्षरातील प्रतिज्ञापत्र -** उमेदवाराने त्याच्या स्व-हस्ताक्षरातील इंग्रजीतील खालील प्रतिज्ञापत्र (१० सेमी X ५ सेमी पांढऱ्या कागदावर काळया / निळया शाई मध्ये लिहीलेले) अपलोड करणे आवश्यक आहे.

**आकारमान** - 800 X 400 pixels in 200 DPI,

**फाईल साईज** - 50 kb - 100 kb

**स्व-हस्ताक्षरातील प्रतिज्ञापत्राचा नमूना**

"I,______________________(Name of the candidate), hereby declare that all the information submitted by me in the application form is correct, true and valid. I will present the supporting documents as and when required."

सदरचे प्रतिज्ञापत्र उमेदवाराने स्वत:च्या हस्ताक्षरात इंग्रजीमध्येच लिहून त्याची स्कॅन प्रत अपलोड करणे आवश्यक आहे. प्रतिज्ञापत्र टंकलिखित केलेले, दुसऱ्या व्यक्तीने अथवा अन्य भाषेत लिहिलेले, आढळून आल्यास उमेदवारी रद्द करण्यात येईल. (लिहू न शकणाऱ्या अंध अथवा अल्प दृष्टी उमेदवारांनी टंकलिखित प्रतिज्ञापत्रावर स्वत:च्या डाव्या हाताच्या अंगठ्याचा ठसा उमटवून सदरच्या प्रतिज्ञापत्राची प्रत अपलोड करणे आवश्यक आहे.)

**१०.४ परीक्षेचे शुल्क -**

१. खुल्या संवर्गातील उमेदवार (अराखीव) : रु. ९५०/-

२. मागासवर्गीय / आर्थिक दृष्ट्या दुर्बल घटक / अनाथ / दिव्यांग उमेदवार : रु. ८५०/-

३. परीक्षा शुल्क ना-परतावा (Non-refundable) आहे.

४. उपरोक्त परीक्षा शुल्काव्यतिरिक्त बँक चार्जेस तसेच त्यावरील देय कर अतिरिक्त असतील.

५. विहित मुदतीत परीक्षा शुल्काचा भरणा करु न शकलेल्या उमेदवारांचा संबंधित परीक्षेसाठी विचार केला जाणार नाही.

**१०.५ अर्ज सादर करण्याची प्रक्रिया / कालावधी -**

| अ.क्र. | तपशील | विहित कालावधी |
|---|---|---|
| १ | अर्ज सादर करण्याचा कालावधी | दि. २३/०३/२०२४ रोजी पासून ते दि.०८/०४/२०२४ रोजी २३.५५ वाजेपर्यंत |
| २ | ऑनलाईन पध्दतीने विहित परीक्षा शुल्क भरण्याचा अंतिम दिनांक | दि.०८/०४/२०२४ रोजी २३.५५ वाजेपर्यंत |
| ३ | परीक्षेचा दिनांक व कालावधी | www.mscepune.in या संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात येईल. तसेच उमेदवारांच्या प्रवेशपत्राव्दारे कळविण्यात येईल. |

१०.६ **जिल्हा / परीक्षा केंद्र निवड -** अर्ज सादर करतांना ३ (तीन) जिल्हा / परीक्षा केंद्रांची निवड करणे अनिवार्य आहे. जिल्हा / परीक्षा केंद्र बदलाबाबतची विनंती कोणत्याही परीस्थितीत अथवा कोणत्याही कारणास्तव मान्य करण्यात येणार नाही. एखादे जिल्हा / परीक्षा केंद्र कार्यान्वित होऊ शकले नाही अथवा एखाद्या जिल्हा / परीक्षा केंद्रावर उमेदवारांना प्रवेश देण्याची क्षमता ओलांडली गेली तर ते जिल्हा / परीक्षा केंद्र निवडलेल्या उमेदवारांची बैठक व्यवस्था दुसऱ्या जिल्हा / परीक्षा केंद्रावर करण्यात येईल.

**११. प्रवेशपत्र :**

११.१ परीक्षेसाठी प्रविष्ठ होणाऱ्या उमेदवारांची प्रवेशपत्रे www.mscepune.in संकेतस्थळावर विशिष्ट लिंकव्दारे उपलब्ध करून देण्यात येतील. त्याची प्रत परीक्षेपूर्वी डाऊनलोड करून घेणे व परीक्षेच्यावेळी उमेदवारांनी सादर करणे आवश्यक आहे. त्याशिवाय परीक्षेस प्रवेश दिला जाणार नाही.

११.२ परीक्षेच्या वेळी स्वतःच्या ओळखीच्या पुराव्यासाठी स्वतःचे आधारकार्ड, निवडणूक आयोगाचे ओळखपत्र, पासपोर्ट, पॅनकार्ड किंवा स्मार्टकार्ड प्रकारचे ड्रायव्हिंग लायसेन्स या पैकी किमान कोणतेही एक मूळ ओळखपत्र तसेच मूळ ओळखपत्राची छायांकित प्रत सोबत आणणे अनिवार्य आहे. प्रवेशपत्र व ओळखपत्र या दोन्ही नावामध्ये कोणत्याही स्वरूपाची तफावत असू नये.

**१२. परीक्षेस प्रवेश :**

१२.१ फक्त पेन, पेन्सिल, प्रवेशपत्र, ओळखीचा पुरावा व ओळखीच्या पुराव्याची सुस्पष्ट छायांकित प्रत अथवा प्रवेशपत्रावरील सुचनेनुसार परवानगी दिलेल्या साहित्यासह उमेदवाराला परीक्षाकक्षात प्रवेश देण्यात येईल.

१२.२ स्मार्ट वॉच, डिजिटल वॉच, मायक्रोफोन, मोबाईल, कॅमेरा अंतर्भूत असलेली कोणत्याही प्रकारची साधने, सिमकार्ड, ब्लू टूथ, दूरसंचारसाधने म्हणून वापरण्यायोग्य कोणत्याही वस्तू, कोणतेही इलेक्ट्रॉनिक उपकरणे, वहया, नोट्स, पुस्तके, बॅग्ज, परिगणक (Calculator) इत्यादी प्रकारची साधने / साहित्य परीक्षा केंद्राच्या परिसरात तसेच परीक्षा कक्षात आणण्यास, स्वतःजवळ बाळगण्यास, त्याचा वापर करण्यास अथवा त्याच्या वापरासाठी इतरांची मदत घेण्यास सक्त मनाई आहे. असे साहित्य उमेदवारांनी आणल्यास ते परीक्षा केंद्राबाहेर ठेवण्याची व त्याच्या सुरक्षिततेची जबाबदारी संबंधित उमेदवाराची राहील. यासंदर्भातील कोणत्याही प्रकारच्या नुकसानीस महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद अथवा परीक्षा केंद्र व्यवस्थापन अथवा परीक्षा आयोजक जबाबदार राहणार नाहीत.

१३. महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आलेली माहिती / जाहिरात अधिकृत समजण्यात येईल.

१३.१ सदर परीक्षेसाठी ऑनलाईन अर्ज करतांना उमेदवारांना काही अडचण उद्भवल्यास bpvmscepune२०२३@gmail.com या इमेल वर संपर्क साधता येईल.

**ठिकाण :** पुणे

**दिनांक :** १३/०३/२०२४

**(अनुराधा ओक)**
**आयुक्त,**
**महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद,**
**पुणे - ०४.**